संगीत नाटकांनी एक काळ वाजत गाजत ठेवला. कै. प्रा. मधुकर अष्टीकरांचे 'ज्ञानीयाचा राजा' हे बालनाट्य, दिनकर देशपांडे, पुरुषोत्तम दारव्हेकर, चंद्रशेखर व-हाडपांडे, अरविंद जाहागीरदार, प्रभाकर पुराणिक व इतर ह्यांची काही बालनाट्य नागपूरच्या पेंडसे, जाहागीरदार आदी मंडळींनी बसविली. ही सर्व मंडळी वैदर्भिय.

दलित रंगभूमीची सुरुवातही श्री. प्रभाकर दुपारे ह्यांच्या 'सातासमुद्रापलिकडे' ह्या नाटकाने, तसेच जीवने, रामटेके आणि इतर काही मंडळींनी विदर्भात प्रामुख्याने नागपूरात भरीव कार्य करुन विदर्भात दलित नाट्य चळवळ जागृत ठेवली. आजही डॉ. बाबासाहेबांच्या जीवनावर महानाट्ये सादर केली जातात. मिलिंद महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य द. भी. चिटणीस ह्यांनी लिहिलेल्या 'युगयात्रा' या नाटकाचा प्रयोग धर्मपरिवर्तनाचे दिवशी नागपूर येथे ६ लाख प्रेक्षकांच्या समोर सादर केल्याचे उदाहरणही विदर्भाचेच.

विदर्भात पथनाट्याची सुरुवात ही नागपूरचे श्रीपाद जोशी, प्रभाकर दुपारे, अरविंद विश्वनाथ (अकोला) यांनी केली. विदर्भात श्री. रु. पां. पांजणकर, खंडेराव जोशी आणि प्रा. म.न. लोही ह्यासारखे अभ्यासू समीक्षकही आहेत. नागपूरच्या प्रतिभा कुळकर्णी ह्यांनी संशोधन करुन 'विदर्भातील नाटककार' हा जो ग्रंथ प्रसिद्ध केला त्यात जवळपास २०० नाटककार आज विदर्भाच्या कानाकोप-यात नाटके लिहित आहेत. झाडीपट्टीतील रंगभूमी हा एक स्वतंत्र विषय आहे. तोही विदर्भाचाच! त्याचप्रमाणे वैदर्भीय व-हाडी लेखक पुरुषोत्तम बोरकर ह्यांच्या कादंबरीवर आधारित 'मेड इन इंडिया' हा एकपात्री सादर करणारे दिलीप देशपांडे, 'रमाई' सादर करणा-या सौ. शोभना मोहरिल, तसेच सौ. शेल जैमिनी व इतर हे सर्व विदर्भाचेच. ह्या सर्व नाटकांमध्ये हौसेने भूमिका करणा-या स्त्री कलावंतही विदर्भाच्याच. ह्याशिवाय नाटकात गाजले त्यांची नावे आपण जाणताच. मात्र सिने अभिनेत्री लीला चिटणीस, स्नेहप्रभा प्रधान, सुमती गुप्ते ह्या